

# १. मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती
# (Pre- Matric Scholarship)

### १) मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय क्र.इमाव–२००३/प्र.क्र.२०१/मावक–३/ दि.२५.७.२००३ अन्वये सन २००३–०४ या शैक्षणिक वर्षापासून ही योजना लागू केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्र.पुरक –२०२२/प्र.क्र.९/शिक्षण–२, दि.२४ मार्च २०२३ अन्वये सुधारीत दर बाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला आहे. सदर योजनेसाठी खालील प्रमाणे अटी व शर्ती आहेत.

१) विद्यार्थीनी ही विजाभज व विमाप्र संवर्गातील असावी.

२) विद्यार्थिनीने शासनमान्य माध्यमिक शाळेत प्रवेश घेतलेला असावा व ती इ. ८ वी ते १० वी पर्यंत नियमित वर्गात शिकत असावी.

३) उत्पन्नाची अट नाही.

इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या सदर प्रवर्गातील विद्यार्थीनींना दरमहा रु.१०० /– प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. १०००/– संबंधित शाळेमार्फत त्यांचे उत्पन्न व गुणांची अट लक्षात न घेता ही शिष्यवृत्ती देण्यात येत होती. दि.२४ मार्च २०२३ अन्वये सुधारीत दर बाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला आहे.त्यानुसार दरमहा रु.३०० /– प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. ३०००/– संबंधित शाळेमार्फत त्यांचे उत्पन्न व गुणांची अट लक्षात न घेता ही शिष्यवृत्ती देण्यात येते.

### २) इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या इतर मागास मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

शासन निर्णय क्र. इमाव–२००३/प्र.क्र.२०१/मावक–३/ दि.२५.७.२००३ अन्वये सन २००३–०४ या शैक्षणिक वर्षापासून ही योजना लागू केलेली आहे. तसेच शासन निर्णय क्र.पुरक –२०२२/प्र.क्र.९/शिक्षण–२ /दि.२४ मार्च २०२३ अन्वये सुधारीत दर बाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला आहे.

इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या सदर प्रवर्गातील विद्यार्थीनींना दरमहा रु.१०० /– प्रमाणे १० महिन्यांसाठी रु.

१०००/– संबंधित शाळेमार्फत त्यांचे उत्पन्न व गुणांची अट लक्षात न घेता ही शिष्यवृत्ती देण्यात येत होती. दि.२४ मार्च २०२३ अन्वये सुधारीत दर बाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला आहे.त्यानुसार दरमहा रु.३०० /– प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. ३०००/– संबंधित शाळेमार्फत त्यांचे उत्पन्न व गुणांची अट लक्षात न घेता ही शिष्यवृत्ती देण्यात येते

**संपर्क – १.संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प, समाज कल्याण.**
**२.संबंधित शाळेचे मुख्याध्यापक**

## ३). माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विजाभज / विमाप्र विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदाने.

शासन निर्णय दिनांक २९ ऑगस्ट १९६६ अन्वये ही योजना विजाभज विद्यार्थ्यांना लागू करण्यांत आली. व शासन निर्णय दिनांक २९ ऑक्टोबर १९९६ अन्वये विमाप्र विद्यार्थ्यांना करिता योजना लागू करण्यांत आली आहे. माध्यमिक शाळेतील हुशार व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता ही योजना सुरु करण्यांत आली आहे

१. विद्यार्थी विजाभज / विमाप्र या प्रवर्गातील असावा.

२. विद्यार्थी इ. ५ वी ते १० वी मध्ये शिकणारा असावा.

३. गतवर्षी वार्षिक परिक्षेत विद्यार्थ्यांना ५० टक्के पेक्षा जास्त गुण घेवून विद्यार्थी वर्गात प्रथम व द्वितीय क्रमाने पास झालेला असावा.

इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना द.म.रु. २०/– प्रमाणे १० महिन्यासाठी रु. २००/– व इ. ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना द.म.४०/– प्रमाणे १० महिन्याकरीता रुपये ४००/– शिष्यवृत्ती दिली जाते.

**संपर्क – संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयास सादर करावेत.**
**बृहन्मुंबई साठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग.**

## ४). इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या इतर मागास विद्यार्थीनीना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

शासन निर्णय प्र.क.२८३/शिक्षण–२ दिनांक ३० जानेवारी २०१९ पासून इतर मागास विद्यार्थीनींना लागू करण्यांत आली आहे. मागासवगीय विद्यार्थीनींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यांसाठी प्रोत्साहनपर अनुदान म्हणून शिष्यवृत्ती दिली जाते. सदर योजनेसाठी खालील प्रमाणे अटी व शर्ती आहे

१. विद्यार्थीनी इतर मागास प्रवर्गातील असावी.

२. विद्यार्थीनी इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणारी असावी.

३. विद्यार्थीनी ही शासन मान्य शाळेत नियमित शिकणारी असावी.

प्रति विद्यार्थीनीस दरमहा रुपये ६०/– प्रमाणे १० महिन्या करीता रु.६००/– ही शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत लाभार्थ्यास अदा केली जात होती. दि.२४ मार्च २०२३ अन्वये सुधारीत दर बाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला आहे.त्यानुसार दरमहा रु.२५० /– प्रमाणे १० महिन्यांसाठी रु. २५००/– संबंधित शाळेमार्फत त्यांचे उत्पन्न व गुणांची अट लक्षात न घेता ही शिष्यवृत्ती देण्यात येते

**संपर्क – या योजनेचे पात्र विद्यार्थीनीचे अर्ज भरुन संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावेत**

## ५) सैनिकी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती –

विजाभज विद्यार्थ्यांना शासन निर्णय क्र.इबीसी–१०७४/५६४/का–५ दि. ६ ऑगस्ट १९७६ अन्वये सदरील योजना लागू करण्यांत आली आहे. याच धर्तीवर शासन निर्णय क्र.संकिर्ण–२००२/प्र.क्र.३७१/मावक–३ दि.५ ऑगस्ट २००३ अन्वये सदरील योजना विमाप्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २००३–२००४ पासून लागू केलेली आहे. शासन निर्णय क्र. इबीसी–२००३/प्र.क्र.१८४/मावक–२ दि.१७/९/२००३ अन्वये रु.१५०००/– वार्षिक शुल्क निश्चित करण्यात आले. सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजाभज / विमाप्र विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेवून भारतीय सैन्य दलामध्ये प्रवेश घेण्यांसा प्रोत्साहन मिळणेसाठी ही योजना सुरु करण्यांत आली आहे. सातारा सैनिक शाळा, भोसला मिलीटरी स्कुल नाशिक, एसएसपीएमएस सैनिक शाळा पुणे या ३ शाळातील विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांना भोजन, कपडे, निवास शिक्षण फी व परिक्षा फी, क्रीडा, घोडे[illegible]राज्य शासन मान्यता प्राप्त सैनिकी शाळेतील प्रवेशितास

प्रति विद्यार्थी वार्षिक रुपये १५०००/- पर्यत संबधीत सैनिकी शाळेस अदा केले जातात.

**संपर्क -संबंधित जिल्हयाचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग व संबधित शाळा/ महाविद्यालयाचे प्राचार्य**

## ६) माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या विजाभज /मुंबई (फक्त मुंबईकरीता)

सदरील योजना शासन निर्णय दि.२९.१०.८६ अन्वये विमाप्र विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात आली आहे सदर योजनेमध्ये पुढीलप्रमाणे अटी व शर्ती आहेत.

१. विद्यार्थी मान्यताप्राप्त शाळेत शिकत असलेला असावा
२. इयत्ता ५ वी ते १० वी पर्यतच्या वार्षिक परीक्षेत ५० % पेक्षा जास्त गुण घेऊन तो वर्गामध्ये प्रथम किंवा द्वितीय क्रमांकाने उतीर्ण झालेला असावा.
३. तो विजाभज व विमाप्र प्रवर्गातील असावा.
४. सदर विद्यार्थ्यास इयत्ता ५ वी ते ७ वी दरमहा २० रुपयाप्रमाणे १० महिन्यासाठी २०० रुपये व इयत्ता ८ वी ते १० वी दरमहा ४० रुपयाप्रमाणे १० महिन्यासाठी ४०० रुपये प्रतिविद्यार्थी शिष्यवृत्ती देण्यात येते.

## ७) इयत्ता १ ली ते १० मध्ये शिकत असणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती (DNT) विद्यार्थ्यांना भारत सरकारची डॉ.आंबेडकर मॅट्रीकपूर्व आणि मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू करणेबाबत.-

शासन निर्णय क. शिष्यवृत्ती-२०१८/ प्र.क्र.४८/शिक्षण, दि.२७ मे २०१९ अन्वये केंद्र शासनाची डी.एन.टी. विद्यार्थ्यांसाठी डॉ. आंबेडकर मॅट्रीकपूर्व योजना सुरु करण्यात आली. सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती व इतर अनुदानाचे दर पुढील प्रमाणे आहेत शिष्यवृत्तीचे दर (प्रतिमाह १० महिन्यांकरिता) .(केंद्र हिस्सा ७५ टक्के व राज्य हिस्सा २५ टक्के)

| अ.क्र. | योजना | इ.१ ली ते ८वी | इ.९ वी ते १० वी मध्ये |
|---|---|---|---|
| १. | शिष्यवृत्तीचे दर (प्रतिमाह) (१ महिन्यांकरिता) | रुपये १००/- | रु.१५०/- |
| २. | केंद्र शासनाची डी.एन.टी. विद्यार्थ्यासाठी डॉ.आंबेडकर मॅट्रीकोत्तर योजना . | | |
| | गट क्रमांक | निर्वाह भत्ता (रु)अनुज्ञेय वसतिगृहात रहाणारे विद्यार्थी | वसतिगृहात न रहाणारे विद्यार्थी |
| | गट-१ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थी | १२०० | ५५० |
| | गट-२ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थी | ८२० | ५३० |
| | गट-३ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थी | ५७० | ३०० |
| | गट-४ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थी | ३८० | २३० |

- **सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क :- संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद व संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग**